**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मध्ययुगीन सामाजिक व सांप्रदायिक पर्यावरण व संत नामदेव

**डॉ जयद्रथ सुभाषराव जाधव**

मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय रेणापूर

पर्यावरण ही संकल्पना व्यापक असून ती भौगोलिक शास्त्राशी आणि एकूणच मानवी जीवनाशी संबंधित आहे. आपल्या अवतीभोवतीच्या निसर्ग व परिसराला आपण सहजपणे पर्यावरण म्हणत असतो. पर्यावरण हे मुक्त असते. निसर्गाची कोणतीही गोष्ट ही सर्वांकरिता, सर्वांसाठी समान व सारखी असते. मानवी जीवनावर पर्यावरणाचा प्रभाव अनादी काळापासून आहे. संस्कृती, धर्म, साहित्य, रूढी- परंपरा,खाणपाण,वेषभूषा, आचारविचार आणि सण-समारंभावर पर्यावरणाचा प्रभाव असतो. पृथ्वीतलावर हा संपूर्ण मानवी समाज हा पर्यावरणाशी निगडित आहे.पर्यावरणाच्या गर्भात संस्कृती आणि धर्मविचार जन्माला आले असून ते पर्यावरणाशी निगडित आहे. यामुळे जगात समान धर्म व समान संस्कृती दिसत नाही.

मध्ययुगीन मराठी संतांनी साहित्यातून सामाजिक पर्यावरणाचा मूलभूत विचार दिला. धर्माचे मूळ स्वरूप हे मानवी मूल्यांत आहे, परंतु मानवी मूल्यांचा विसर भारतीय वैदिक धर्म तत्त्वात सहजपणे दिसतो. वैदिक धर्म हा समाज सापेक्ष असण्यापेक्षा तो धर्मगुरू किंवा पुरोहित सापेक्ष आहे.तो सर्वसमावेशक असण्यापेक्षा लिंग भेदभाव दर्शक आहे.तो मानवी शरिरशास्र व पर्यावरण सापेक्ष असण्यापेक्षा तो शरिरशास्त्र व पर्यावरणाशी एकरूप नाही. मुळामध्ये मानवी प्रवृत्तीही निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाकडून मानवाने मुक्त, स्वतंत्र वृत्तीशिकली आहे. पण ह्या पर्यावरणीय स्वतंत्रतेचा प्रभाव वैदिक धर्मात दिसून येत नाही. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय म्हणजे एकूण मानवी जीवनाला वर्ण,लिंगातून नियंत्रित करण्याचा प्रयत्न वैदिक धर्माने केला आहे.धर्माधिन समाजव्यवस्था निर्माण करून वर्ण,लिंग भेदाची समाजव्यवस्था सोयिस्करपणे भारतीय समाजात टीकून आहे.वर्ण व लिंग विषमतेचे समर्थन करताना वैदिक धर्माने जी मांडणी केली आहे, ती वैज्ञानिक दृष्टिने पूर्णपणे अशास्त्रीय आणि अविवेकी आहे.ती पर्यावरणशास्र,विज्ञान आणि मानवतेच्या दृष्टीने निराधार आहे. म्हणून भारतीय उपखंडात आणि जगाच्या पाठीवर सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनात जी स्थित्यंतरे मध्ययुगात घडून आली त्याचे मूळ कारण निसर्गवादी विचार आहे. धार्मिक व सामाजिक जीवनात मुक्त वातावरणाचा प्रभाव भारतीय समाजात सातत्याने राहिला आहे.प्राचीन वैदिक धर्माला लोकायत, जैन, बौद्ध, पेरियार, बसवेश्वर लिंगायत धर्म, महानुभाव आणि वारकरी संप्रदायाने आव्हान दिले आहे. वैदिक धर्म परंपरा नाकारून सामाजिक समान तत्त्वांचा आधार घेऊन नवी सांप्रदायिक मांडणी मध्ययुगीन संतांनी केली आहे.ही मांडणी मानवतावादी, समतावादी,लिंग भेदभावमुक्त समाजाची होती. वर्ण-कर्म प्राधान्यापेक्षा कर्म-कर्तव्य, चारित्र्यशील,एकता,अहिंसा, परोपकार, सेवा, दया,प्रेम, सहानुभूतीचीहोती.

मध्ययुगीन सामाजिक पर्यावरणाचा विचार केला असता वारकरी संप्रदायाच्या संतांनी सामाजिक पर्यावरण सलोख्याचे, समतेचे ठेवले आहे.संत ज्ञानेश्वर, संत नामदेवापासून सुरू झालेली ही परंपरा संत तुकाराम ते संत बहेणाबाई पर्यंत दिसून येते.संत विचारांचा मूळ गाभा हा सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात एकता निर्माण करणे हा आहे.संस्कृत भाषा व शब्दबंबाळ आध्यात्मिक विचाराला वारकरी धर्माचा अग्रणी भक्त पुंडलिकाने ईश्वराच्या प्राप्ती साठी विशिष्ट वर्ण व जातीचे असण्यापेक्षा भक्ती,प्रेम,निष्ठा आणि समर्पनातून

(अर्पण) ईश्वर साध्य करता येतो.हा ईश्वर निर्गुण निराकार आहे पण तो सगुण साकार आई-वडिलांच्या रूपात आहे. हा कौटुंबिक सौख्याचा विचार भक्त पुंडलिकाने आध्यात्माच्या संदर्भाने दिला. वारकरी धर्माची ही आध्यात्मिक क्रांती होती.वैदिक धर्मातील वर्ण,कर्म आणि कर्मकांडाला धक्का न लावता सोयिस्करपणे निसर्ग तत्त्वांचे अनुसरण करणारा पर्यावरणीय स्वतंत्रतेचा विचार मध्ययुगात वारकरी भक्त पुंडलिकाने दिला आहे.भक्तीमार्गाचा मूळ गाभा हा भगवद् गीतेत आहे.म्हणून नाथ संप्रदायाच्या प्रेरणेतून गुरू संत निवृत्तीनाथांच्या

उपदेशाने संत ज्ञानेश्वरांनी भगवद् गीतेवर भावार्थदीपिका निरूपणातून ग्रंथ साकार होतो.

मध्ययुगीन सामाजिक पर्यावरणाचा विचार करता संत नामदेवांच्या भक्ती कार्याला आध्यात्मिक व सामाजिक अधिष्ठान आहे. सामाजिक आणि धार्मिक जीवनात सातत्याने विषमता निर्माण केलेली असली तरी वारकरी संतांनी समता निर्माण करण्याचा प्रयत्न सतत केलेला आहे. मध्ययुगातील निरक्षर, अज्ञानी समाजाला अध्यात्माचे ज्ञान देण्यासाठी वारकरी संतांनी अभंग काव्याची निर्मिती केली, सहज सोपी बोली भाषा आणि सहज साधी अध्यात्म भक्तीची मांडणी करून आध्यात्मिक क्रांती होती. या आध्यात्मिक क्रांतीत संत नामदेवांचे योगदान मोठे आहे.संत नामदेवांनी आध्यात्मिक आणि सामाजिक पर्यावरणाचा समतोल साधला आहे. ज्या काळात वर्ण व जातीच्या मुळे समाज अनेक गटातटात विभागलेला होता, त्या काळात संत नामदेवांनी समाज संघटित केला.एकसंघ

केला. आध्यात्माच्या क्षेत्रात शूद्र, बहुजन आणि स्त्रियांना अधिकार नाही असे सांगितलेले होते, पण निरपेक्ष,नि:स्वार्थ भक्तीभाव, श्रद्धापूर्वक नामस्मरण, दया परोपकार व अहिंसा या

तत्त्वाधारे भक्ती केली तर विठ्ठल प्रसन्न होतो. आणि हा करण्याचा अधिकार समाजातील सर्व स्तरातील लोकांना आहे, हे त्यांनी सांगितले.

'कुश्चळ भूमीवरी उगवली तुळशी, अपवित्र तियेशी म्हणू नये'

यावरून व्यक्तीचा जन्म कुठे झाला हे महत्त्वाचे नाही, तर जन्माला आल्यानंतर तो व्यक्ती कोणत्या विचारांचा आहे. त्या व्यक्तीचे सामाजिक आणि पारमार्थिक चारित्र्य किती निष्कलंक आहे, यावर त्याचे गुणात्मक व्यक्तिमत्त्व आणि विठ्ठलाचा भक्त म्हणून श्रेष्ठता ठरते.हे आपल्या कार्यातून संत नामदेवांनी निक्षून सांगितले.भक्ती ही जाती-वर्ण प्रधान नाही, तर ती भक्ती प्रधान आहे. या विचारामुळे तेराव्या शतकात पंढरपूरच्या वाळवंटात संतांनी जाती शुद्रत्त्व हे चंद्रभागेमध्ये बुडवून वैष्णव धर्म धारण केला. हा वैष्णव धर्म म्हणजेच वारकरी धर्म आहे. हाच विठ्ठल भक्तांचा धर्म आहे. या धर्मात कोणीही उच्च व कोणीही निच नाही, कोणीही शूद्र कोणीही श्रेष्ठ नाही. कोणीही पुरुष कोणीही स्त्री नाही.कोणीही श्रीमंत कोणीही गरीब नसून सर्व विठ्ठल भक्त आहेत. यामुळे पंढरपुरात सामाजिक समतेचे आध्यात्मिक पर्यावरण निर्माण झाले.समाजाला एकतेचा मंत्र दिला. हाच सामाजिक पर्यावरणीय विचार सामाजिकतेच्या अंगाने दिलेला आहे. संत नामदेवांनी आध्यात्मिक आणि सामाजिक अंगाने तेराव्या शतकात पर्यावरण शुद्धतेचा विचार दिला आहे. संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत नरहरी सोनार, संत सावता माळी, संत सेना न्हावी तर संत जनाबाई अशा अठरापगड जातीतील संत आणि जनाबाईच्या रूपाने स्त्री वर्गांना आध्यात्मात स्थान प्राप्त करून दिले. आध्यात्माच्या

क्षेत्रात संत नामदेवांनी केलेली नवी मांडणी पर्यावरण पूरक होती.कर्मठतेपेक्षा भक्तीला प्राधान्य देऊन सामाजिक सलोख्याचा पर्यावरण विचार दिला.

संत नामदेवांचा सामाजिक व आध्यात्मिक व्यवस्थेत पर्यावरणाचा विचार आहे.

संदर्भ:-

१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,ल.रा.नसिराबादकर, फडके प्रकाशन कोल्हापूर दहावी आवृत्ती२०१३.
२) संत नामदेव गाथा
संपादक हरी श्रीधर शेणोलीकर, साहित्य अकादमी प्रकाशन दिल्ली पुनरावृत्ती२०१२.
३) मराठी संतांचे सामाजिक कार्य, डॉ.विष्णू भिकाजी कोलते मुंबई पहिली आवृत्ती२०१४